


चतुर कोंबडा





# चतुर कोंबडा



विक्तर वाझ्दायेव यांनी
सांगितलेली करेलीयाची दंतकथा

प्रगती प्रकाशन

मॉस्को



कोणे एके काळी दोन पोरकी मुले रहात होती. एक भाऊ आणि एक बहीण. त्यांचे आई-वडील वारले होते. एक लाल तुरेवाला कोंबडा तेवढा त्यांनी आपल्या मुलांसाठी आपल्या माघारी ठेवला होता.

एक दिवस असा उजाडला की घरात अन्नाचा एक कणही शिल्लक नव्हता. तेव्हा भाऊ आपल्या बहिणीला म्हणाला :

"कोठारात जा आणि तिथं काही सापडतंय का बघ. मला सपाटून भूक लागलीय!"

बहीण कोठारात गेली, पण ते अगदी रिकामे होते. म्हणून तिने झाडू घेतली व कणगा स्वच्छ करून टाकली. तिला तेथे रायचा एक दाणा सापडला.

तिने तो दाणा आपल्या भावाला दाखविला आणि त्यांनी तो पेरायचा असे ठरविले.

परसामागे त्यांनी एक लहान खळगा खणला, त्यात तो रायचा दाणा पेरला व त्यावर माती लोटली.

दुसऱ्या दिवशी भल्या सकाळी भावाने परसदारी नजर टाकली तो त्याला दिसले काय! जेथे त्यांनी दाणा पेरला होता तेथून सुरूच्या झाडाएवढा जाड देठ उगवला होता आणि तो एवढा उंच वाढला होता, की त्याचा शेंडा आभाळाला भिडला होता!

"जादूची ही कमालच म्हणायची!" मुलगा मनाशी म्हणाला. "तिथं वर शेंड्यापाशी काय आहे ते पहावं!" त्याने देठावरून चढायला सुरुवात केली.

चढत चढत तो थेट ढगांपाशी पोहोचला तेव्हा त्याला दिसले की, देठाने ढगांना फाडले होते व तो आणखी उंच गेला होता. म्हणून मुलगा ढगांवर उतरला आणि ढगांवरून सरळ चालत निघाला. चालत चालत शेवटी तो एका छोटया घरापाशी पोहोचला. त्याने घराचे दार उघडले, तो आत गेला. आतमध्ये एका कोपऱ्यात एक कुरूप म्हातारी बसली होती. तिला एकच डोळा होता. तो डोळा टेंगळा-







सारखा फुगून पुढे आला होता आणि घारीच्या डोळ्याप्रमाणे चमकत होता. म्हातारी जात्यावर दळत बसली होती. त्या जात्यामधून धिरडी आणि समोसे खोलीभर भिरीभिरी उडत होते.

त्या म्हातारीकडे पाहिले म्हणजे छातीत भीतीने धडकीच भरत होती. पण तिच्या दळणामधून धिरडी आणि समोसे निघत असलेले पाहताना मात्र हसू फुटले असते. कारण ती धिरडी आणि ते समोसे भिरभिरत जाऊन थेट चुलाण्यावरच्या पोत्यात पडत होते!

त्या मुलाला खूप भूक लागली होती. त्याने कसलाही विचार न करता ताबडतोब ते पोते खेचून घेतले, आपल्या पाठीवर टाकले आणि धावतच तो तेथून परत निघाला. देठापर्यंत तो धावत आला आणि त्यावरून सरसर खाली जमिनीवर उतरला. अगदी पटकन!

"बघ मी काय आणलंय!" तो आपल्या बहिणीला म्हणाला.

आता त्यांच्यापाशी पोते भरून धिरडी व समोसे होते. त्यामुळे भावा-बहिणीला उपास घडत नव्हते. पण कोणतीच गोष्ट कधी कायम टिकत नाही. एक दिवस असा उजाडला की, त्यांनी पोत्यात हात घातला तेव्हा त्यांच्या हाताला रिकामा तळ लागला. आता काय करायचे? उपाशी राहणं तर शक्य नव्हते. म्हणून मुलाने परत देठावर चढून जायचे ठरविले.

"ए भाऊ, मला घेऊन चल ना तुझ्याबरोबर!" बहीण म्हणाली.

"ते शक्य नाही," भाऊ उत्तरला. "जेव्हा तू म्हातारी बघशील तेव्हा घाबरून किंचाळशील, किंवा जाते पाहून एकदम मोठ्यांदा हसशील आणि आपण पकडले जाऊ."

पण बहिणीने पुन्हा विनवणी केली:

"मी किंचाळणार नाही किंवा हसणार नाही. शप्पत! ए भाऊ, ने ना मला तुझ्याबरोबर!"

शेवटी तो कबूल झाला आणि ती दोघेही देठ चढू लागली. आकाशात गेल्यावर त्यांनी ढगांवर पाऊल ठेवले, रस्ता शोधला व त्यावरून चालू लागली.

खूप अंतर चालत चालत शेवटी ती त्या छोट्या घरापाशी पोहोचली.


ती दोघे आत आली तेव्हा खोलीच्या एका कोपऱ्यात ती कुरूप म्हातारी जात्यावर दळत बसलेली त्यांनी पाहिली. म्हातारीला एकच फुगीर डोळा होता आणि तो घारीच्या डोळ्याप्रमाणे चमकत होता.

"आई ग! मला भीती वाटते!" बहीण हळूच किंचाळली.

पण भाऊ काहीच बोलला नाही. म्हातारीला त्यांचे बोलणे ऐकू जाईल आणि त्यांच्यावर संकट कोसळेल ह्याची आठवण देण्यासाठी त्याने फक्त आपल्या हाताच्या कोपऱ्याने बहिणीला कुशीत हळूच ढोसले.

म्हातारी जात्याची मूठ गरागरा फिरवीत होती आणि प्रचंड नवल घडले! जात्याखालून धिरडी आणि समोसे एका पाठोपाठ एक उडत येऊ लागले.

हे दृश्य बहिणीला एवढे विलक्षण आणि गंमतीचे वाटले की, तिला भान राहिले नाही व ती हसत सुटली: "खी, खी, खी!"







तिचे हसणे काही फार मोठ्या आवाजात नव्हते. पण म्हातारीला ते ऐकू गेले. तिने मान वळवून मागे पाहिले. भाऊ-बहिणीची जोडी नजरेला पडताच ती ओरडली :

"अरे चोरांनो! आता कसे माझ्या तावडीत सापडलात! माझी सगळी धिरडी आणि समोसे तुम्हीच पळवून नेलेत नाही का?"

भाऊ-बहीण काहीही न बोलता पुतळ्यांप्रमाणे स्तब्ध उभे राहिले.

म्हातारीने चुलाणा पेटविला.

"आता मी तुम्हाला खरपूस भाजून खाणार!" म्हातारी म्हणाली. "चल रे पोरा! चटकन माझ्या फावड्यावर येऊन बैस! तू पहिल्यांदा चुलाण्यात जायचं!"

मुलगा फावड्यावर बसला. पण त्याने आपले पाय आणि हात पुढे पसरून धरले. त्यामुळे त्याला चुलाण्याच्या भोकातून आत आगीत लोटणे म्हातारीला काही केल्या जमेना.

म्हातारी म्हणाली :

"तू बरोबर नाही बसलास! चुलाण्याकडं डोकं करून बैस! असं पाय पसरून नाही बसायचं!"

मुलगा उत्तरला :

"आजीबाई, तू काय सांगतेस ते मला समजत नाही. त्यापेक्षा असं कर, तूच त्या फावड्यावर मला बसून दाखव!"

ती म्हातारी चेटकीण अंगाची मुटकुळी करून आणि चुलाण्याकडे डोके करून फावड्यावर बसली. मुलाने ताबडतोब तिला चुलाण्यात कोंबले.

आता भाऊ आणि बहीण सुरक्षित झाले. म्हातारीच्या तावडीतून सुटल्यामुळे त्यांना खूप आनंद झाला. त्यांनी ते जाते आपल्याबरोबर घेतले व देठ उतरून ती दोघे घरी परतली.

आता जाते दळले म्हणजे त्यांना पोटभर खायला धिरडी व समोसे मिळत होते. सोबतीला लाल तुरेवाला कोंबडा होता. त्यामुळे त्या दोघा मुलांना कसलीच चिंता राहिली नव्हती आणि त्यांचा वेळ खूप मजेत चालला होता.

पण एक दिवस झारला त्या जादूच्या जात्याची बातमी समजली. त्याने आपल्या सेवकांना जात्याचा शोध करायला पाठविले. सेवकांनी जाते शोधले व भावा-बहिणीकडून हिसकावून घेऊन ते निघून गेले.

लौकरच त्या पोरक्या लहान मुलांजवळचे अन्न संपले व पुन्हा ती उपाशी राहिली.

भाऊ आणि बहीण रडू लागले. कोंबड्याने त्यांचे रडणे ऐकले तेव्हा पंख फडफडवीत तो त्यांच्यापाशी गेला व म्हणाला :

"कॉक-कॉक-कॉक! झारपासून मी जातं परत आणतो!"

आणि झारला भेटायला तो निघाला.

चालत चालत तो निघाला. वाटेत त्याला एक अस्वल भेटले.

"तू कुठं निघालास?" अस्वलाने विचारले.







"झारकडून जातं परत आणायला. दोन पोरक्या लहान मुलांपासून त्यानं हिसकावून नेलंय."

"मी येऊ तुझ्याबरोबर?" अस्वलाने विचारले.

"चल! माझ्या उजव्या पंखाखाली बैस!"

अस्वल पटदिशी कोंबडयाच्या उजव्या पंखाखाली जाऊन बसले आणि कोंबडयाची स्वारी पुढे निघाली.

चालत चालत तो खूप अंतर गेला. मग त्याला एक लांडगा भेटला.

"कोंबडेबुवा तुम्ही कुठं चाललात?" लांडग्याने विचारले.

"झारकडून जातं परत आणायला. दोन पोरक्या लहान मुलांपासून त्यानं हिसकावून नेलंय."

"मी येऊ तुमच्याबरोबर?"

"चल! माझ्या डाव्या पंखाखाली बैस!"

लांडगा पटदिशी कोंबडयाच्या डाव्या पंखाखाली जाऊन बसला आणि कोंबडयाची स्वारी पुढे निघाली. खूप खूप चालत तो एका छोटया तळयापाशी पोहोचला.

"कोंबडया, कोंबडया, तू चाललास कुठं?" तळयाने विचारले.

"झारकडून जातं परत आणायला. दोन पोरक्या लहान मुलांपासून त्यानं हिसकावून नेलंय."

"मी येऊ तुझ्याबरोबर?"

"चल, तू माझ्या गळयातल्या पिशवीत बरोब्बर मावशील!"

कोंबडयाने तळयाला गटागटा पिऊन टाकले आणि त्याची स्वारी पुढे निघाली.

झारच्या घरापाशी कोंबडा आला आणि झारच्या झोपण्याच्या खोलीच्या खिडकीखाली उभे राहून गाऊ लागला:


"मला कोंबडयाला लाल लाल तुरा, दुष्ट झारला मुळीच नाही तुरा! पोरक्या मुलांचं जातं चोरतो, गरीबांना उपाशी मारतो!"

झारला खूप राग आला आणि कोंबडयाला हाकून देण्याची त्याने आपल्या सेवकांना आज्ञा केली. पण कोंबडयाने सेवकांना तुरी दिली व तो परत गाऊ लागला:

"मला कोंबडयाला लाल लाल तुरा, दुष्ट झारला मुळीच नाही तुरा! पोरक्या मुलांचं जातं चोरतो, गरीबांना उपाशी मारतो!"

झारने आपल्या सेवकांना बोलाविले. आणि कोंबडयाला पकडून तबेल्यात जंगली घोडयांच्या टापांखाली चिरडून मारण्याची त्याने आज्ञा केली. सेवकांनी कोंबडयाला पकडले आणि तबेल्यात फेकून दिले. पण कोंबडयाने उजव्या पंखाखालून अस्वलाला बाहेर काढले व अस्वलाने सर्व घोडे ठार मारले.







दुसऱ्या दिवशी सेवक तबेल्यापाशी आले आणि त्यांनी दाराचे कुलूप काढले. कोंबडा एकदम बाहेर आला, राजाच्या झोपण्याच्या खोलीच्या खिडकीपाशी उडत गेला व गाऊ लागला:

"मला कोंबडचाला लाल लाल तुरा, दुष्ट झारला मुळीच नाही तुरा! पोरक्या मुलांचं जातं चोरतो, गरीबांना उपाशी मारतो!"

आता झार खूपच संतापला. कोंबडचाला पकडून मेंढवाडचात फेका, म्हणजे माजलेले एडके त्याचा चेंदामेंदा करतील, अशी त्याने आपल्या सेवकांना आज्ञा केली.

सेवकांनी झारच्या आज्ञेप्रमाणे केले, पण कोंबडा मुळीच घाबरला नाही. त्याने आपल्या डाव्या पंखाखालून लांडग्याला बाहेर काढले आणि लांडग्याने सर्व एडक्यांना ठार मारले.

दुसऱ्या दिवशी सकाळी झारचे सेवक मेंढवाडचात आले तेव्हा सर्व एडके मरून पडलेले त्यांना आढळले. कोंबडा धावत बाहेर गेला, झारच्या राजवाडचापर्यंत उडत गेला आणि त्याच्या झोपण्याच्या खोलीच्या खिडकीखाली उभे राहून गाऊ लागला:

"मला कोंबडचाला लाल लाल तुरा, दुष्ट झारला मुळीच नाही तुरा! पोरक्या मुलांचं जातं चोरतो, गरीबांना उपाशी मारतो!"

संतापाने आणि हताश झाल्यामुळे झार थरथर कापू लागला. कोंबडचाच्या कटकटीमधून कसे सुटावे तेच त्याला समजेना.

त्याने सेवकांना बोलावले आणि आज्ञा केली की, आपला लोखंडी बान्या* खूप खूप तापवा आणि मग कोंबडचाला त्यात फेकून द्या, म्हणजे भाजून तो मरेल!

सेवकांनी कोंबडचाला बान्यामध्ये टाकले, पण कोंबडचाने आपल्या गळयातील पिशवीमधील तळयाचे सर्व पाणी बाहेर टाकले, अन् काय! बान्या पाण्याने भरून गेला व थंडगार झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी झारच्या सेवकांनी बान्या उघडताच कोंबडा वेगाने बाहेर धावला, झारच्या राजवाडचापर्यंत उडत गेला व झोपण्याच्या खोलीच्या खिडकीखाली उभे राहून गाऊ लागला:

"मला कोंबडचाला लाल लाल तुरा, दुष्ट झारला मुळीच नाही तुरा! पोरक्या मुलांचं जातं चोरतो, गरीबांना उपाशी मारतो!"

कोंबडचाचे काय करावे ह्या विचाराने झारचे डोके फिरले. कोबडचाला पकडा आणि न्याहरीसाठी शिजवा अशी त्याने सेवकांना आज्ञा केली. पण त्याला राग एवढा अनावर झाला होता की, सेवकांची वाट पाहणे त्याला अशक्य ठरले व त्याने कोंबडचाला आख्खेच्या आख्खे जिवंत गिळले!

कोंबडा झारच्या पोटामधून गाऊ लागला:

"मला कोंबडचाला लाल लाल तुरा, दुष्ट झारला मुळीच नाही तुरा! पोरक्या मुलांचं जातं चोरतो, गरीबांना उपाशी मारतो!"

झारने कोंबडचाची विनवणी सुरू केली:

---

*बान्या – वाफेची आंघोळ घ्यायचे न्हाणीघर. – अनु.

“कोंबडोबा, कोंबडोबा, बाहेर ये! मला छळू नको! तुला वचन देतो, पुन्हा मी तुझ्या वाटेला जाणार नाही!”

“मुळीच बाहेर येणार नाही! त्या दोन पोरक्या मुलांना जातं परत देत नाहीस तोपर्यंत तुझ्या पोटातच बसून राहणार!” कोंबडा म्हणाला. आणि तो पुन्हा गाऊ लागला:


“मला कोंबड्याला लाल लाल तुरा, दुष्ट झारला मुळीच नाही तुरा! पोरक्या मुलांचं जातं चोरतो, गरीबांना उपाशी मारतो!”

लोक उभे राहून हे ऐकत आणि दुष्ट झारची फजिती पाहून फिदीफिदी हसत. ह्यातून काही उपाय नाही असे पाहून दुष्ट झारने त्या पोरक्या मुलांना त्यांचे जाते परत केले. तेव्हा कोंबडा झारच्या पोटातून उडी मारून बाहेर आला व घरी पळाला.

त्याला पाहून भावाला आणि बहिणीला खूप आनंद झाला.

त्या वेळेपासून ते तिघे अत्यंत सुखाने एकत्र राहिले. जात्यामधून एवढी धिरडी आणि एवढे समोसे तयार होत, की ते पुन्हा कधीही उपाशी राहिले नाही. त्यांच्यासारख्या इतर गरीब लोकांना खाऊ घालण्यासाठी नेहमी त्यांच्यापाशी पुरेसे अन्न शिल्लक राहू लागले.








अनुवाद : अनिल हवालदार

चित्रे : ओव्चीन्निकोव

Петушок с красным гребешком

*На языке маратхи*

Для дошкольного возраста



© मराठी अनुवाद, प्रगती प्रकाशन, १९८१



सोविएत संघात मुद्रित

П $\frac{70801\text{-}121}{014(01)\text{-}81}$ без объявл. 4803000000

ИБ № 10740